Marathi IX 2017-18

विषय-मराठी
इयत्ता- नववी
गुण-८०

सुचना- १)प्रत्येक प्रश्नांचे उत्तर नवीन पानावर लिहा-
२)प्रश्नांचा क्रमांक व उपप्रश्नांचा क्रमांक स्पष्टपणे लिहा-
३)सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहेत.-
४)उजवीकडील अंक पूर्ण गुण दर्शवितात-

प्रश्न१ला- पुढील प्रत्येक विधानाखाली चार पर्याय दिलेले आहेत त्यातील अचूक पर्याय निवडून विधान पूर्ण करून लिहा-

१) लहानपणी लेखकाच्या घरची अर्थिक स्थिती.......... (१)
अ)मजबत होती.
ब) हलाखीची होती.
क) मध्यम होती.
ड) गरीबीची होती.

२) संस्कृत भाषेत पाण्याला जीवन असे म्हटले आहे,कारण .........(१)
अ) संजीव माणसाला जगण्यासाठी पाण्याची आवश्यकता असते.
ब) त्यामुळे पृथ्वीची तहान भागते.
क) झाडांचे जीवन पाण्यावर अवलंबून आहे.
ड) भारतीय संस्कृती पाण्यावर निर्भर आहे.

३) लेखक आजीच्या अस्थी घेऊन.......(१)
अ) बनारसला गेला.
ब) अलाहाबादला गेला.
क) दिल्लीला गेला.
ड)लखनऊला गेला.

४) राजेंद्रसिंह यांच्या मते भविष्यात........(१)
अ) पाणि टंचाई उग्र स्वरूप धारण करेल.
ब) लोकसंख्या वाढीस लागेल.
क) पाण्यावरुन युध्द सुध्दा छेडले जाऊ शकते.
ड) पाणी टंचाई नाहीशी होईल.

५) आईने जरीची वेलबुट्टी असलेली मखमली.......(१)
अ) शर्ट आणला
ब) पेन आणला
क) टोपी आणली
ड) बॅग आणली

(ब) पुढीलपैकी कोणत्याही सात प्रश्नांची उत्तरे ऐका वाक्यांत लिहा-(७)

१) दारावरची बेल वाजल्यानंतर रमाने काय केले ?

२) रात्रीच्यावेळी लेखकाला माऊची भीती का वाटते ?

३) गोव्यात पाणलोट विकास कार्यक्रम कोठे कोठे राबविला जातो ?

४) बागाईतकर मास्तरांनी कोटाची बटणे का सोडली ?

५) लोहिया मडगावात कुठे राहीले होते ?

६) मुलाच्या अभ्यासात कोण कोण व्यत्यय आणतात ?

७) आमराई कोणत्या उद्देशानं लावली आहे ?

८) आजीने अलहाबादला येण्याचा हट्ट का धरला ?

९) राणी पांढरे निशाण चढवायला का तयार नव्हती ?

१०) मंडण कशाला म्हटले जात असे ?

प्रश्न २रा अ) खाली अ गटात पाठांची नावे ब गटातील त्यांच्या लेखकांची नावे दिली आहेत , त्यांच्या योग्य जोडया जुळवून लिहा-(४)

| अ गट | ब गट |
|---|---|
| १) त्यांची आठवण ठेवा | अ) डॉ. दत्ताराम भा. देसाई |
| २) दोन मेणबत्या | ब) रवींद्र पिंगे |
| ३) १८जून १९४६ | क) अनंत काणेकर |
| ४) जलसंवर्धन | ड) मनोहर हिरबा सरदसाई |

(ब) खालीलपैकी कोणत्याही दोन प्रश्नांची उत्तरे दोन ते तीन वाक्यांत लिहा-(६)

१) सुरभीच्या घरी शिक्षकांनी काय पाहिले ?

२) जलचक्र म्हणजे काय ?

३) नटवर्गाचा पेहराव कशा पध्दतीचा होता ?

४) मुलगा आपल्या घरच्यांची कोणकोणती कामे करतो ?

प्रश्न ३रा अ) पुढील प्रत्येक विधानासमोर चार पर्याय दिले आहेत त्यातील अचूक पर्याय निवडून विधान पूर्ण करुन लिहा-(२)

(१) संत तुकारामांना हे जग........

अ) दत्तमय आहे असे वाटते

ब) विष्णूमय आहे असे वाटते

क) गणपतीमय आहे असे वाटते

(२) दूधावरी आली बुरी तिले.......

अ) नेक म्हनू नये

ब) साय म्हनू नये

क) भवती म्हनू नये

ड) रात म्हनू नये

(ब) खालील दिलेल्या काव्यांशांच्यां योग्य जोडया लावा-(२)

| अ | ब |
|---|---|
| १) विद्यावैभव दे रे राम | अ) तुका म्हणे एका देहाचे अवयव |
| २) बलराम त्यात मिळालासे | ब) तो माझा पक्षपाती |
| | क) आई मज मारु नको |
| | ड)उदासनिता दे रे राम |

(क)खालील कवितांच्या ओळीतील मोळया जागी कंसातील दिलेल्या पर्यायी शब्दांपैकी योग्य शब्द लिहून ओळी पूर्ण करुन लिहा-(४)

१)-------किरणांचा सोनसळी अभिषेक.(चादण्यांला,नक्षत्राला,गगनाला)

२)घेऊन येईन--------नक्षत्रांचा शालू. (बाजारातून, परदेशातून,आभाळातून)

३)हलवू झाडे----- पिसे शोधु या वनी मोरांची.(प्राजवताची, आब्यांची, चिटबोरांची)

४)इवल्याशा------आमुच्या चमके तुझाच तारा.(खोपीत, झोपडीत, बंगल्यात)

प्रश्न४था अ) खालीलपैकी कोणत्याही सात प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यांत लिहा-(७)

१) आईच्या ओठावरील गाणे केव्हा सुकून जाते ?

२) सावल्या का जागल्या ?

३) बाजारात कोणती गोष्ट विकत मिळत नाही ?

४) बहिणाबाईच्या मते भवती कशाला म्हणू नये ?

५) बालकृष्ण यशोदेला कोणती विनंती करतो ?

६) केविलवाण्या सूर्यास्ताबद्दल कवियत्री काय म्हणते ?

७) तुकाराम महाराजांना कोणती गोष्ट अमंगळ वाटते ?

८) बिनभिंतीच्या शाळेत कोणकोण शिक्षक आहेत ?

९) सूर्योदयामुळे कोण कोण जागे झाले आहेत ?

१०) शिवगीतातून आपण कोणाची महती गातो ?

प्रश्न ५वा अ) कंसातील सूचनेप्रमाणे लिहा-

१)ते सारे राजांचे सेवकच होते.(सर्वनाम ओळखून लिहा)-(१)

२) सुधा शाळेत जाणार.(काळ ओळखून लिहा)-(१)

३) राधा कधी कधी सूरजच्या घरी जाते.(१)

४)शिवाजी हे परक्रमी राजा होते.(१)

५)अर्णव आणि शर्मद खेळायला गेले.(१)

ब) पुढील वाक्यांतील अधोरेखित शब्दांच्या जाती ओळखून लिहा-

१) सर्वजण गावाबाहेरच्या झरीकडे <u>निघाले</u>.(१)

२) आईने <u>त्यांना</u> फिरायला नेले.(१)

३)मायाने <u>सोनेरी</u> रंगाचा चुडीदार घातला(१)

४)सगळे <u>माझ्याभोवती</u> गोळा झाले.(१)

क) पुढील उदाहरणाप्रमाणे खालील शब्दांपासून विशेषणे बनवा-(२)

जसे-बहादूर-बहादूरी

१) गरीब-

२)ऊब-

३)ज्ञान-

४)गुण-

ड) पुढील उदाहरणाप्रमाणे खालील शब्दांपासून भाववाचक नामे बनवा-(२)

जसे-माणूस-माणूसकी

१)नाटक

२)विर-

३)नम्र-

४)उष्ण-

इ)पुढील उदाहरणाप्रमाणे खालील शब्दांची लिंगे बदलून लिहा-(२)

१)स्त्री-

२)वर-

३)मुलगा-

४)घोडा-

ई)पुढील उदाहरणाप्रमाणे खालील शब्दांची अनेकवचनी रुपे लिहा-(२)

१) दरवाजा-

२)गाडी-

३) अंगठी-

४) खुर्ची-

प्रश्न६वा अ) पुढील अ गटातील शब्दांच्या ब गटातील विरुध्दार्थी शब्दांशी योगय जोड्या लावा -(२)

| अ गट | ब गट |
|---|---|
| १)संशय | अ)निरोगी |
| २)गुण | ब)अवगुण |
| ३)मंगल | क) नि:संशय |
| ४)रोगी | ड)अमंगल |

ब) खालील अ गटातील शब्दांच्या ब गटातील समानार्थी शब्दांशी योग्य जोडया जुळवा-(२)

| अ गट | ब गट |
|---|---|
| १) झाड | अ) डोळा |
| २) रान | ब) मस्तक |
| ३) चक्षू | क) तरु |
| ४) डोके | ड) जंगल |

क) खालील शब्दांचे नामांच्या प्रकारामध्ये वर्गीकरण करा-(४)

(सामान्यनाम, विशेषनाम, भाववाचकनाम)

चमत्कारिपणा,वाळपई,नदी, मोठेपण,पुस्तक, कमलेश

ड) खालील वाक्यांतील सर्वनाम ओळखून लिहा-(४)

१) त्याचा मित्र दुकानदार आहे.

२) तो जमिनदाराचा मुलगा होता.

३) त्या दिवशी गावातील सर्व लोक दु:खी होते.

४) ऐवढे वरदान मला दे.

इ) खालील वाक्यांतील अव्यये ओळखून लिहा- (४)

१) तो झाडावर लवकर लवकर चढू लागला.

२)अबब! केवढी मोठी बाग.

३)असे सगळे माझ्याभोवती जमा झाले.

४) समीरने आपल्या शरीराकडे पाहिले.

प्रश्न ७वा खालील पत्र लिहा-(५)

तुम्ही आदित्य राणे आहात. तुमचा पत्ता ॐकार रेसीडेन्सी,पोलीस स्टेशन जवळ फोंडा-गोवा आहे.

तुमच्या काकाला वाढदिवसाला छान भेटवस्तू दिल्याबद्दल धन्यवाद देणारे पत्र लिहा.

खालील मुद्दायाचा आधार घ्या.

१) तुम्हाला भेटवस्तू का आवडली

२) तुम्ही तीचा कसा उपयोग केला

३) तुम्हाला ती कशी वाटली

प्रश्न ८वा-पुढील चित्राच्या आधार त्याखालील उतारा वाचून दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा-(५)

राजूची खोली नीटनेटकी नाही.जवळ जवळ त्याची सर्व खेळणी जमीनीवर आहेत.त्याची पुस्तके सर्व ठीकाणी पसरली आहेत. राजूची आई त्याचा पंलग लावते.पण तो त्याच्या वस्तू पंलगावर टाकतो.त्याला बटाटा चिप्स खायला आवडतात. पण तो रिकामी पाकिटे चादरीवरच ठेवतो त्याची खोली धुळीने भरली आहे. राजू त्याची खोली स्वच्छ ठेवायला मदत करत नाही.



प्रश्न:-

१) राजूची खेळणी कुठे पडली आहेत ?
२) राजूचा पंलग कोण लावते ?
३) रिकाम्या चिप्स पाकिटाच राजू काय करतो ?
४) राजूची खोली नीटनेटकी का नाही ?
५) राजूची खोली कशाने माखली आहे ?